महाराष्ट्र शासन
उद्योग संचालनालय

कार्यालय, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी

Email:didic.parbhani@maharashtra.gov.in Web:www.parbhanidic.in

जा.क्र.जिउकेप/ जिल्हा निर्यात प्रचालन समिती/ २०२१/ दिनांक:- ०८.०९.२०२१

## जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा इतिवृत्त

परभणी जिल्ह्याच्या निर्यात वृद्धी कृती आराखड्याच्या मंजुरी अनुषंगाने दि. ०६.०९.२०२१ रोजी मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी येथे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील स्वाक्षरी करणारे सदस्य उपस्थित होते.

| Sr. No. | अधिकाऱ्याचे नाव | पद | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | मा. श्रीमती आंचल गोयल,(भाप्रसे) | अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय |
| 2 | श्री. आर.एस.केदार | उपअभियंता | म.औ.वी.मं. परभणी |
| 3 | श्री.पी.एन.निनावे | जिल्हा अग्रणी बँक अधिकारी | LBO परभणी |
| 4 | श्री.बी.बी.कांबळे | RO ऑफिसचे सदस्य | म.औ.वी.मं.नांदेड |
| 5 | श्री. प्रवीण नलावडे | उपसंचालक | DGFT, पुणे (Online Present) |
| 6 | श्री. सुदीप मिटकरी | प्रतिनिधी | NY Consultancy पुणे (Online Present) |
| 7 | इनामदार मो.अशरफ मो. युसुफ | निर्यातदार | विश्वास अग्रो |
| 8 | श्री. एस.बी.सोमवंशी | GSTO | GST ऑफिस |
| 9 | श्री. सुभाष इंगेवार | MSME | MSME DI, औरंगाबाद |
| 10 | श्री. एन.एन.इस्तोलकर | सहसंचालक | MSME DI, औरंगाबाद |
| 11 | श्री.पी.एम.जंगम | AGM | NABARD |
| 12 | श्री.एन.ए. बाहेती | निर्यातदार | कोहिनूर रोप इंडस्ट्रीज |

बैठकीच्या प्रारंभी जिल्हा उद्योग केंद्र,परभणी कार्यालयाचे व्यवस्थापक श्री. आर.एस.पत्की यांनी सर्व सदस्यांचे परिचय करून स्वागत केले. सुरुवातीस श्री. सुदीप मिटकरी, NY Consultancy, Pune यांनी Export Promotion Initiative in Maharashtra याबाबत online सादरीकरण केले. श्री. आर.एस.पत्की ,व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र परभणी यांनी नियोजित Export Action Plan for Parbhani District याबाबत online सादरीकरण केले.श्री.प्रवीण नलावडे, उपसंचालक ,DGFT, पुणे हे online सभेस उपस्थित होते. सदर सादरीकरणाच्या वेळी मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सूचना खालील प्रमाणे आहेत.:-

Scanned with CamScanner

| अ.क्र. | बाब | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|
| १. | District Export Promotion Plan मधील मुद्दा क्र. २.१ मध्ये One District One Plan अंतर्गत हरभरा या पिकाबाबत माहिती दर्शविली आहे. या पिकाची निवड कशी करण्यात आली, याबाबत मा. अध्यक्षांनी विचारणा केली. जिल्ह्यातील इतर महत्वाच्या पिकांचा जसे उस व कापूस चा समावेश करण्यात येईल असे DGFT यांनी सांगितले .त्याबाबत माहिती घेऊन DGFT, पुणे यांनी योग्य ते स्पष्टीकरण द्यावे असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. | DGFT, पुणे, उद्योग संचालनालय, मुंबई |
| २. | ड्राय पोर्ट जालना त्वरीत सुरु करणे बाबत मे.कोहीनुर रोप्स यांनी सुचित केले. त्यामुळे वेळ आणि वाहतूकीच्या खर्चात फरक पडेल असे सुचविले. यावर मा.अध्यक्ष यांनी राज्य शासन स्तरावर या बाबत पाठपुरावा करावा अशा सुचना दिल्या. | राज्य सरकार , DGFT, पुणे |
| ३. | कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांवर आधारित उद्योजक यांची माहिती घेऊन त्यांची क्लस्टर उभारणीसाठी योग्य ती कार्यवाही करावी. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात फळ व फुल उत्पादक शेतकरी आहेत तसेच काही भागात मोठ्या प्रमाणात रेशीम उद्योग आहेत. यांना एकत्रित करून क्लस्टर उभारणीसाठी प्रयत्न करावेत. अशी सूचना मा. अध्यक्षांनी दिली. | जिल्हा उद्योग केंद्र, कृषी विभाग व कृषी विद्यापीठ |
| ४ | Forein Exchange ची सुविधा असलेली Banking facility जिल्ह्यामध्ये सुरु करण्याबाबत उद्योजकांनी मागणी केली. तसेच याबाबतचे दर हे अंतरराष्ट्रीय बँके प्रमाणे कमी असावे याबाबत मागणी केली. यावर अध्यक्षांनी जिल्हा अग्रणी अधिकारी यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले. | जिल्हा अग्रणी शाखा व्यवस्थापक |
| ५ | Loan Target for Cotton Exporters हे रु.३ कोटींचे आहेत व साध्य रु. ४८ लक्ष झाले आहे अशी माहिती AGM, NABARD श्री. जंगम यांनी दिली यावर मा. अध्यक्ष यांनी संपूर्ण उद्दिष्ट प्राप्त करणेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी सूचना दिली. | जिल्हा अग्रणी शाखा व्यवस्थापक व AGM, NABARD |
| ६ | परभणी जिल्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची विस्तृत माहिती घेऊन त्यांना निर्यातक्षम बनवण्यासाठी योग्य ते प्रयत्न करावेत अशी सूचना अध्यक्षांनी दिली. | जिल्हा कृषी अधिकारी व जिल्हा उद्योग केंद्र. |
| ७ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ बाबत संपूर्ण माहिती सदर करणेबाबत अध्यक्षांनी सूचित केले. एकूण प्लॉट ची संख्या, रिक्त असलेल्या प्लॉटची संख्या, MIDC क्षेत्रात सुरु असलेल्या उद्योगांची संख्या, बंद उद्योग घटकांची संख्या याबाबत संपूर्ण माहिती सदर करण्याबाबत अध्यक्षांनी सूचित केले. | विभागीय अधिकारी , महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड |
| ८ | निर्यातदार उद्योजकांनी अनियमित विद्युत पुरवठा व वारंवार होणाऱ्या tripping बाबत अडचणी असल्याचे सांगितले. यावर उद्योजक आणि कार्यकारी अभियंता तसेच अधीक्षक अभियंता यांच्या समवेत स्वतंत्र बैठक आयोजित करण्याबाबत मा. अध्यक्ष यांनी निर्देश दिले. | जिल्हा उद्योग केंद्र, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता |
| ९ | DGFT ( Directorate General of Foreign Trade) यांचे कडुन निर्यात प्रोत्साहने मिळण्यासाठी अडचणी येत असल्याबाबत मे.विश्वास ॲग्रो इंडस्टीज झरी यांनी सांगितले. या वर शासन स्तरावर व DGFT यांना योग्य तो पाठपुरावा करण्यात यावा असे मा.अध्यक्षांनी सांगितले. | राज्य सरकार , DGFT, पुणे |

Scanned with CamScanner

शेवटी श्री. आर. एस. पत्की , व्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र परभणी यांनी उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाली असे जाहीर केले.

महाव्यवस्थापक,
तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती,
परभणी

मा. जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती, परभणी

Scanned with CamScanner